# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दि.२६/८/२००९ रोजी संपन्न झालेल्या (दि.२५ रोजीची तहकुब सभा) स्थायी समिती सभेचे (का.प.क्र.१२) इतिवृत्त**

बुधवार, दिनांक २६ ऑगष्ट २००९ रोजी स्थायी समितीची सभा मा.सभापती श्री.अब्दुल साजेद अब्दुल सत्तार यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिका मुख्य कार्यालयातील 'मलिक अंबर स्थायी समिती सभागृह' येथे **दुपारी १२.१० वाजता** 'वंदे मातरम्' या गिताने सुरू झाली. या सभेस मा.आयुक्त श्री. पुरूषोत्तम भापकर, भा.प्र.से., नगर सचिव श्री.एम.ए.पठाण यांचेसह संबंधीत अधिकारी तसेच खालीलप्रमाणे सन्माननीय सभासद उपस्थित होते.

०१. श्री. कटकटे सतीश विश्वनाथ
०२. श्री. जावेद हसन खान
०३. श्री. घडमोडे भगवान देवीदास
०४. श्री. पाथ्रीकर दत्ताभाऊ अण्णासाहेब
०५. श्री. देसरडा प्रशांत सुभाष
०६. श्री. कुचे नारायण तिलोकचंद
०७. श्रीमती मेहरून्नीसा खान हमीद खान
०८. श्री. पांडे विनायक प्रभाकर
०९. श्री. सोनवणे कचरू श्रीपत
१०. श्री. निमगांवकर प्रल्हाद गणपतराव
११. सौ. मोमीन सफिया फिरदौस
१२. श्री. शिंदे दामोधर माधवराव

**<u>संवाद :</u>**

मा.सभापती : मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 106 (3) अन्वये मुख्य लेखा परीक्षक यांनी सादर केलेल्या सन 2006-07,2007-08 च्या वार्षिक लेखा परिक्षण अहवालावर विचार विनिमय करणे बाबत प्रशासनाने सादर केलेला आहे.

श्री.नारायण कुचे
श्री.प्रल्हाद निमगांवकर : लेखा परिक्षण अहवालाचे अभ्यासासाठी वेळ देण्यात यावा.

श्रीमती सफिया मोमीन : उड्डाण पुलाच्या आजुबाजूच्या रस्त्यांची अवस्था बिकट झालेली आहे मा.आयुक्त साहेबांनी त्याठिकाणी पाहणी करावी.

मा.सभापती : मा.आयुक्तांनी भेट दिलेली आहे.

श्रीमती सफिया मोमीन : याबाबतची माहिती मला नाही मा.सभापती उड्डाणपुलाची आत्ताच पहाणी करावी.

मा.आयुक्त : शहर अभियंता व मी स्वतः त्या ठिकाणी पहाणी करण्यासाठी गेलो होतो. वॉर्डात फिरून आलो. सभा असल्याने आपणांस बोलावले नाही. वेळ कमी होता. जे काही प्रॉब्लेम असेल ते सोबत बैठक घेवुन या बाबतीत कुठल्या समस्या आहे हे जाणुन घेवू.

श्री.भगवान घडमोडे : कुशीनारा मागासवर्गीय सहकारी संस्थेच्या बाबतीत मागील बैठकीत चर्चा केली होती. जागेसंबधी माहिती आलेली आहे. प्रशासनाने जे मुद्दे उपस्थित केलेले आहे. त्याच्यामाध्यमातून महानगरपालिकेत एक एक घोटाळे उघडकीस येत आहे. कुशीनारा सोसायटीत कोण कोण सभासद आहे याबाबतची माहिती उपलब्ध झाली पाहिजे होती. याबाबतची माहिती घेण्यात यावी.

मा.सभापती : कुशीनारा मागासवर्गीय गृहनिर्माण संस्थेचे सभासद कोण आहेत याची माहिती आहे का?

मालमत्ता अधिकारी : कुशीनारा मागासवर्गीय गृहनिर्माण संस्थेची संचिका मालमत्ता विभागातून मा.सभापती साहेबांकडे पाठविलेली आहे. संचिका बघीतल्यानंतर माहिती देता येईल.

मा.सभापती : संचिका आपणाकडे देत आहे, सभासदांची यादी संचिकेमधे आहे काय बघुन घ्यावे. लिजडिड करून देण्यात आली आहे काय कुणाला, बांधकाम परवानगी देण्यात आली आहे काय? जर बांधकाम परवानगी दिली असेल तर टाउन प्लॅनिंग विभागाने संचिका मागवुन माहिती देण्यात यावी. 50 हजार फुटाचा ओपन स्पेसमधे बांधकाम परवानगी दिली का? सध्या बांधकाम चालू आहे ती परवानगी दिली आहे काय? याबाबतची माहिती देण्यता यावी. विभागातून माहिती घेतली असता विभागाच्या म्हणण्यानुसार विभागाने कुणालाही बांधकाम परवानगी दिलेली नाही. कुशीनाराची मुळ संचिका गहाळ झालेली आहे.

मालमत्ता अधिकारी : हि जी संचिका आहे त्यामधे मुळ जे आदेश आहे ॲग्रीमेंट झालेले ते आहे.

मा.सभापती : संबधीत सोसायटीस महानगरपालिकेने लिज डिड करून दिलेली आहे काय?

मालमत्ता अधिकारी : संचिकेमधे प्रस्ताव आणि ठराव दिलेला आहे.

मा.सभापती : प्रश्न आहे की, महानगरपालिकेने संबधीत लोकांना लिजडिड करून दिलेली आहे काय? 1985 पासून लोक तेथे राहतात. नविन काहीजण त्या ठिकाणी आले आहे. महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांच्या व्यतिरीक्त दुसऱ्या लोकांनी तीन तीन मजली इमारती बांधकाम केलेल्या आहेत. त्यास प्रशासनाने परवानगी दिलेली आहे काय? संचिकेमधे एखादया सभासदाचे नांव आहे काय?

मालमत्ता अधिकारी : यामधे ऑर्डर दिलेली आहे, लिज ऑफ ओपन लॅन्ड सर्व्हे नंबर 35 situated at Jaswantpura.

मा.सभापती : आदेश बाबत विचारणा केली नाही. त्या जागेची लिजडिड कुशीनारा सहकारी गृहनिर्माण संस्थेला करून दिलेली आहे काय? लिजडिड नसतांना दुसऱ्या लोकांना कसे विकण्यात आले.

मालमत्ता अधिकारी : कसे विकले याबाबत माहिती देवू शकत नाही, उपलब्ध कागदपत्रानुसार,संचिकेनुसार आदेश दिलेले आहे. आदेशानुसार लिज ऑफ ओपन लॅन्ड सर्व्हे नंबर 35 situated at Jaswantpura to the Krushinara Society Aurangabad असे आहे लिज डीड सांगू शकरणार नाही. आदेश आहेत तत्कालिन उपआयुक्त औरंगाबाद महानगरपालिका यांनी केलेले आहे.

मा.सभापती : प्रश्न आहे की, लिज डिड,भाडेपट्टा करून दिलेला आहे काय? याबाबत खुलासा करण्यात यावा. जी संचिका स्थायी समितीकडे पाठविली आहे त्या व्यतिरीक्त कशाच्या आधारे लिज डिड करून देण्यात आली आहत का? मालमत्ता अधिकारी संचिका पहात आहे त्यात पहिल्याच पानावर लिहिलेले आहे कुशीनारा मागासवर्गीय गृहनिर्माण संस्था जागा देण्याबाबतची मुळ संचिका उपलब्ध नाही. तसे संचिकेमधे लिहिलेले आहे काय खुलासा करण्यात यावा. महानगरपालिकेचे तत्कालिन आयुक्त श्री.गोविंद गारे यांनी 1993मधे अंतिम नोटीस देवुन हि जागा रिकामी करण्याचे आदेश मालमत्ता विभागाला दिले होते सन 1993 नंतर काही कारवाई केली आहे काय?

मालमत्ता अधिकारी : लिज भरण्यासाठी पत्र देण्यात आले आहे आणि लिज भरून घेतलेली आहे.

मा.सभापती : लिजडिड नसतांना भाडे भरून घेण्याची काय घाई होती. तत्कालिन आयुक्तांनी अंतिम नोटीस देवुन जागा खाली करण्याचे आदेशीत केले होते 16 वर्षात प्रशासनाने कुठली कारवाई केली.

मालमत्ता अधिकारी : तत्कालिन अधिकाऱ्यांनी काय केले हे मी सांगू शकत नाही. मालमत्ता अधिकारी पदाचा चार्ज आल्यापासून एक एक मॅटर निकाली काढत आहे.

श्री.सतिष कटकटे : ॲग्रीमेंट केलेली माहित नाही, कोण सभासद आहे याची माहिती नाही तर पैसे कसे भरून घेता.

मा.सभासद : मुळ संचिका गायब असतांना प्रशासनाने पैसे भरून घेण्याची घाई केलेली आहे. तत्कालिन आयुक्तांच्या आदेशानुसार 8 टक्के भाडे आकारायला पाहिजे तेवढे वसुल केलेले आहे का?

मालमत्ता अधिकारी : भाडे भरण्यासाठी पत्र देण्यात आले आहे.

मा.सभापती : सन 1985 पासून पत्र लिहित आहे. सन 1993 ला अंतिम नोटीस दिली होती त्यानंतर प्रशासनाने कुठली कारवाई केली खुलासा करण्यात यावा.

मालमत्ता अधिकारी : आपण पत्र दिले आहे. मी आल्यापासून नोटीस दिली. पैसे भरून घेतले. माझ्या पुर्वीच्या अधिकाऱ्यांनी काय केले हे मी सांगू शकणार नाही.

श्री.सतिष कटकटे : त्या ठिकाणी अनाधिकृत बांधकाम केले गेले आहे.

मा.सभापती : प्रशासनाने खुलासा करावा की, टि.पी. विभागाने बांधकाम परवानगी दिलेली आहे काय?

सहा.संचालक न.र : आपण सुचना दिल्याप्रमाणे चौकशी केली असता बांधकाम परवानगी देण्यात आलेली नाही.

श्री.प्रशांत देसरडा : कुशीनारा गृहनिर्माण सोसायटीस लिजवर जागा दिलेली नाही कारण लिजवर दिली असतीतर लिज बाबतीत कागदपत्र संचिकेत असली असती.

लिजवर न देता कर्मचाऱ्यांनी त्यावर अतिक्रमण करून जागा ताब्यात घेतलेली आहे. कुठलीतरी चुकीची लेआऊटची प्रिंट संचिकेस लावण्यात आली आहे. त्याच्यात ती ओपनस्पेस दाखविली आहे ती ओपनस्पेस सदर कर्मचाऱ्यांनी विकली आहे. एखादया दुकानाचे भाडे भरले नाहीतर कर्मचारी जावून दुकानास सिल लावले जाते दुकान ताब्यात घेतात परंतु मा.आयुक्तांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी अंतिम नोटीस देण्याचे आदेश दिले परंतु सन 1985 पासून ते 2006 पर्यंत त्या त्या मालमत्ता अधिकाऱ्यांनी दुर्लक्षीत केल्यामुळे संचिका गहाळ झाली असेल कारण मुळ संचिका शोधण्याचा प्रयत्नच केला नाही. सन 1985 पासून ते आजपर्यंत सोसयटीने भाडे भरले नाही. महानगरपलिकेची ओपनस्पेस विकली आहे हा गंभीर गुन्हा आहे. ज्याप्रमाणे त्रिवेणी सोसायटीचा एक कमिटी नेमुण अहवाल समोर आला. कुशीनारा गृहनिर्माण सोसायटीची चौकशी व्हावी महानगरपालिकेची ओपनस्पेस 2 एकर जागा विकुण टाकलेली आहे. 32 भुखंड सोसायटीसाठी मंजूर केलेले आहे. आज जवळपास 80 लोक त्या ठिकाणी राहतात. महानगरपालिकेचे ओपन स्पेस विकुन टाकलेले आहे. त्यामुळे त्रिवेणी सारखा अधिकाऱ्यांमार्फत हा अहवाल यायला पाहिजे. चौकशी अहवाल तीन दिवसांमधे मागविण्यांत यावा. एका अधिकाऱ्यांचा संपूर्ण जिवणाचा पगार होत नाही तेवढा एक प्लॉट विकुण त्यांनी पैसे वसुल केलेले आहे त्यामुळे सक्षम अधिकाऱ्याकडुन आम्ही जी मागणी केलेली आहे ती बरोबर,सत्य आहे की नाही ओपन स्पेस विकल्या गेली की नाही,मुळ संचिका कुठे गायब झाली याबाबतची सक्षम अधिकाऱ्यामार्फत तीन दिवसात चौकशी व्हावी.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : स.सदस्यांनी जी सुचना केली त्यास माझे अनुमोदन आहे. सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे अशा किती सोसायटया आहेत की ज्यांना महानगरपालिकांने कर्मचाऱ्यांना जागा दिलेल्या आहे. सोसायटीची जेवढी जमीन आहे त्याच्या व्यतिरीक्त तिथे महानगरपालिकेची जागा अस्तित्वात आहे काय? सदरील घोटाळे 20 ते 25 वर्षापुर्वीचे आहेत आज शाश्वती वाटत नाही. 20-25 वर्षात झाले नाही. आज काय होईल. जे जे अधिकारी असतील चौकशी करावी. सेवानिवृत्त असतील त्यांची माहिती घ्यावी. कायदेशीर कार्यवाही करा व गुन्हे दाखल करावे. नंतर चौकशी करावे. बरेच बाहेर येईल.

मा.सभापती : मी व दहा ते बारा स.सदस्य त्या ठिकाणी गेलो होते त्या ठिकाणी तीन तीन मजली मोठे बांधकाम चालू आहे. प्रशासनास विचारणा केली असता प्रशासनाने सांगीतले की, कुणालाही बांधकाम परवानगी दिली नाही.

श्री.विनायक पांडे : आपण माहिती दिल्यावरच घोटाळे बाहेर येणार आहे काय? पोलिस गुन्हा नोंदविल्यानंतरच सदरील घोटाळे कुणी करायला लावले ते उघडकीस येईल.

मा.सभापती : तत्कालिन आयुक्त श्री.गुप्ता साहेब असतांना त्याठिकाणी 200 बेडचे हॉस्पिटलसाठी थाटात प्रपोजलचे उद्घाटन केले.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : एमजीएमच्या बाजूला एक अद्यावय हॉस्पिटल व्हावे असे प्रपोजल होते. जोपर्यंत सदरप्रकरणाचा निर्णय लागत नाही, कायदेशीर होत नाही तो पर्यंत

कुठल्याही सोसायटीस परवानगी देवू नये तसेच कृशीनारा सोसायटीच्या बाबतीत सर्वप्रथम गुन्हे नोंदविण्यात यावे.महानगरपालिकांचे वकीलांचे पॅनल आहे ते त्यांना मिळालेले आहे. ते कधीही हजर राहत नाही.

श्री.प्रशांत देसरडा : महापालिका आयुक्त आयएएस दर्जाचे अधिकारी यांच्या बंगल्यात कचरा टाकण्यात आला. अद्याप अटक झाली नाही. हा कचरा आहे, त्यात काही असते तर, लक्ष दिले नाही तर काय होते हे समोर ठेवावे.

मा.सभापती : मा.आयुक्त जास्तीत जास्त लक्ष केंद्रित करत आहेत.

श्री.सतिष कटकटे : महापालिकेतील मागासवर्गीय कोण त्या ठिकाणी राहतात. 35 लाखात त्या ठिकाणी खरेदी केलेले आहे.

श्री.भगवान घडमोडे : अधिकाऱ्यांना दहा ते पंधरा हजार पगार आहे.

श्री.सतिष कटकटे : अधिकाऱ्यांनी 35 लाखात घरे खरेदी केले आहे.

श्रीमती खान मेहरून्निसा : सदरची सोसायटी भाडेपट्टयावर दिलेली आहे याबाबतची माहिती देण्यात यावी जे सभासद होते ते त्या ठिकाणी राहण्यासाठी आहे काय?

श्री.नारायण कुचे : सध्या तिथे जे बांधकाम चालू आहे ते कुणाचे बांधकाम चालू आहे त्याबाबतीत माहिती देण्यात यावी. प्रशासनाने अतिक्रमणाबाबत माहिती घेतली आहे काय?

मा.सभापती : प्रशासकीय अधिकारी त्या ठिकाणी गेले होते का? त्याबाबतीतचे 17.08.2009 रोजीचे पत्र आहे.

प्रशासकीय अधिकारी : जसवंतपुरा बायजीपुरा येथील कुशीनारा गृहनिर्माण सोसायटीच्या जागेवरील बांधकामाच्या बाबतीत प्रशाकिय विभागाचे तत्कालिन इमारत निरीक्षक श्री.शेख कादर यांनी पहाणी करून यांत्रिकी विभाग व मनपा कर्मचारी निवासस्थानाच्या उत्तरेस असलेल्या कुशीनारा हॉउसिंग सोसायटीच्या जागेवरील बांधकामाबाबत विचारणा केल्यावरून तिथे राहत असलेले मनपा कर्मचारी श्री.शेख वाहेद आणि श्री.साजेद मिर्झा यांना परवानगी व मालकी हक्कांबाबत विचारणा केली असता संबधीतांनी जागा मालकी हक्क मनपाची असून गृहनिर्माण सोसायटीस लिजवर घेतलेली आहे. त्यासंबधीतचे कागदपत्र संस्थेचे चेअरमन श्री.पंडागळे यांचेकडे आहेत. जागेवर कोणतेही कागदपत्र दाखविले नसल्याने संस्थेस जागा किती आकाराची, संस्थेला दिलेले जागेचे रेखांकन, मंजूर नकाशा तसेच संस्थेचे सभासद यादी यासह इकडील कार्यालयास उपलब्ध करून दिल्यास खुली जागा व रस्ते यावरील अतिक्रमण,अनाधिकृत बांधकाम काढणे कार्यवाही प्रस्तावित करता येईल. उपरोक्त बाबत माहिती तात्काळ उपलब्ध करून देण्यास्तव 17.08.2009 रोजी कळविण्यात आलेले होते.

श्री.भगवानग घडमोडे : सदरचे कर्मचारी मागासवर्ग प्रवर्गात आहे काय खुलासा करण्यात यावा.

मा.सभापती : श्री.साजेद मिर्झा नावाचा कर्मचारी मनपामधे आहे काय? मनपामधे कुठल्या पदावर कार्यरत आहे,

सहायक आयुक्त-1 : श्री.साजेद मिर्झा हा लिपीक संवर्ग कर्मचारी कायमस्वरूपी आहे

श्री.भगवान घडमोडे : मागासवर्गीयमधे येतो काय?

सहायग आयुक्त-1 : खुल्या संवर्गात येतो.

| | |
|---|---|
| श्री.भगवान घडमोडे | : सदरची सोसायटीस मागासवर्गीय सोसयटी म्हणून ओळखण्यात येते, परंतु कर्मचारी खुल्या संवर्गातील आहे तर मग त्यांना तो प्लॉट अलॉट कसा केला. |
| मा.सभापती | : त्यांना प्लॉट अलॉट कसा केला, प्रशासनाने माहिती द्यावी. |
| श्री.सतिष कटकटे | : सदर जागेची पहाणी केली असता त्यांनी 35 लाखात विकत घेतली आहे. आज त्या ठिकाणी मोठमोठे बंगले आहे. 50 लाखांचे बांधकाम केले आहे. |
| मा. सभापती | : श्री.साजेद मिर्झाला मालमत्ता विभागाकडून अलॉट झालेले आहे का? |
| मालमत्ता अधिकारी | : नाही. |
| श्री.भगवान घडमोडे | : अलॉटमेंट केलेले नाही तर मग बांधकाम कसे चालू आहे ते पाडले पाहिजे. |
| मा.सभापती | : प्रशासनाने खुलासा करावा की, अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि सचिव कोण आहेत. |
| श्री.भगवान घडमोडे | : उप निबंधक ऑफिसला पत्र देवून त्रिवेणी, व कुशीनारा बाबत महानगरपालिकेत चौकशी चालू आहे संचिका सिल करण्यात याव्यात म्हणून माहिती दिली पाहिजे. |
| मा.सभापती | : मुळ संचिका गायब आहे राहिलेली संचिका कुशीनाराची हि उपआयुक्त(म) यांचेकडे त्वरीत देण्यात येईल. |
| श्री.नारायण कुचे | : तालुका निबंधकाकडे सभासदांची यादी मिळेल. |
| श्री.भगवान घडमोडे | : पोलिस गुन्हे दाखल करण्याचे आदेश देण्यात यावे. |
| श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर | : जे आपल्या अधिकारात आहे त्याचा वापर करण्यात यावा. |
| मा.सभापती | : तत्कालिन आयुक्तांनी आदेश दिलेले आहे केव्हाही जमीन ताब्यात घेवू. |
| श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर | : कायदेशीर गुन्हे दाखल करण्यात यावेत. |
| मा.सभापती | : मुळ संचिका असलेली सभासदांची संचिका गहाळ झालेली आहे. प्रशासनाकडे सध्या जी संचिका आहे त्यात सभासदांची यादी जोडलेली आहे काय? |
| मालमत्ता अधिकारी | : सभासदाची यादी नाही फक्त सोसायटीची कार्यकारणी आहे चेअरमन श्री.उत्तम हिवराळे, सचिव श्री.उत्तम पंडागळे सदरील कर्मचारी हे मनपामधे होते आणि आहे. तथापी आस्थापना विभागाकडुन माहिती घेण्यात यावी. |
| मा.सभापती | : श्री.उत्तम हिवराळे, सचिव श्री.उत्तम पंडागळे आणि श्री.मधु गंगावणे मनपाचे कर्मचारी आहेत काय? |
| सहायक आयुक्त-1 | : श्री.उत्तम हिवराळे, श्री.उत्तम पंडागळे, श्री.मधुकर गंगावणे हे सर्व महानगरपालिकेचे कर्मचारी होते कायम आहेत. श्री.उत्तम हिवराळे वार्ड-फ, श्री.उत्तम पंडागळे वार्ड-अ, श्री.मधुकर गंगावणे वार्ड-ब मधे कार्यरत आहेत. |
| मा.सभापती | : याच्यावर इतर काही केसेस चालू आहेत का? |
| सहायक आयुक्त-1 | : याबाबत आमच्याकडे माहिती नाही. |
| मा.सभापती | : एकाच वेळेस निलंबीत झाले काय? चौकशी झाली होती का. |
| सहायक आयुक्त-1 | : श्री.उत्तम हिवराळे यांचे विरूध्द सन 2007 रोजी बडतर्फ कर्मचाऱ्याला सेवेत पुनःर्स्थापित केल्यामुळे त्यांची खाते चौकशी झाली होती त्यावरून त्यांना पदावन्नत करण्यात आले. |
| श्री.सतिष कटकटे | : सध्या तिथे जे बांधकाम चालू आहे ते थांबविण्यात यावे. त्यास सिल लावावे. |

मा.सभापती : प्रशासनाने तेथील बांधकाम तात्काळ थांबविण्यात यावे. यावे सिल लावण्यात यावे.

श्री.सतिष कटकटे : संबधीतांविरूध्द गुन्हे दाखल करण्यात यावे.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : महानगरपालिकेत जेवढे घोटाळे आहेत याच्या संदर्भात औरंगाबादचे जे कमिश्नर त्यांच्याशी चर्चा करून मधल्या काळात केसेस दाखल केले तर माहिती होईल. चौकशी समितीत जे प्रतिनियुक्तीवर आले त्यांना द्यावे.

मा.आयुक्त : आजही हि दुर्देवी बाब की कुशीनारा मागासवर्गीय गृहनिर्माण सहकारी संस्थेला जी जागा दिली होती या संस्थेच्या बाबतीत पुन्हा अनेक गैरव्यवहार समोर येत आहे. प्राथमिक माहिती समोर आलेली आहे आणि जी चर्चा समोर आलेली आहे. महापालिकेचा हेतू चांगला होता चांगला आहे मागासवर्गीय कर्मचाऱ्यांना घरे मिळावित हया उदांत हेतुने काम केलेले होते. पदाधिकाऱ्यांनी यास वेगळा मोड दिला, चुकीच्या पध्दतीने काम केले हि अतिशय गंभीर बाब आहे शहराच्या पुढच्या विकासाच्या दृष्टीने आणि नावाच्या दृष्टीने यासर्व बाबीमधे अतिशय चांगल्या पध्दतीने लक्ष घालण्याची गरज आहे आणि ती आपण करू. यातही दोन तीन बाबी तातडीने कराव्यात असा निर्णय आपण घेवुया. जे बांधकाम चालू आहे ते तातडीने थांबवुन त्याचे पंचनामे करावेत आणि कुणाचे बांधकाम आहे, कधी परवानगी घेतली यासंदर्भातील माहिती दोन दिवसांमधे नगर रचना विभागाने पहावी. या संदर्भात जे कर्मचारी सोसायटी, सोसायटीचे पदाधिकारी ज्यांच्याकडे हे अधिकार आहेत ज्यांच्यामार्फत हा व्यवहार झालेला दिसतो, त्यांना प्रशासनाने दुपारी म्हणणे मांडण्यासाठी संधी द्यावी. तातडीने नोटीस काढावी. 24 तासांच्या अवधीत त्यांचे म्हणणे मागवावे उदया तीन वाजेपर्यंत त्यांना त्यानुषंगाने निलंबनाची नोटीस द्यावी. तीसरा मुद्दा म्हणजे संपूर्ण चौकशी मा.सभापती यांनी सांगीतल्याप्रामाणे श्री.घुगे यांनी करावी. त्यांना आवश्यक असणारे विधी सल्लागार किंवा अभियंता त्यांनी बरोबर घ्यावे. निलंबन 24 तासांत ठरवणार. पुढच्या ज्या काही इतर सोसायटया आहे त्यांच्याबाबतीत धोरण ठरविता येईल. ज्या ज्या सोसायटयांना जागा दिल्या आहे अशा सर्व सोसायटयांच्या जागांचा तपशिल येत्या 15 दिवसात शहर अभियंता यांनी अहवाल द्यावा.

मा.सभापती : त्रिवेणी नगरचा अहवाल आलेला आहे त्यात गुन्हा दाखल करण्याचे आदेश देणार आहे.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : आपल्या लेवलपर्यंत माहिती मागवू परंतु अशा ज्या सवयी लागलेल्या आहेत लोकांना की महानगरपालिकेमधे काहीही होते हे होवू नये या करीता महानगरपालिकेतर्फे कायदेशीर हालचाली कराव्या लागतील.

मा.आयुक्त : अहवाल आल्यावर पुढील कार्यवाही करता येईल.

मा.सभापती : याबाबत सर्व चर्चा झालेली आहे मा.आयुक्तांनी प्रभावीपणे सर्व बाबींचा खुलासा केलेला आहे. दोन वाजेच्या आत त्यांना कारणे दाखवा नोटीस देवु आणि 24 तासांच्या आत निलंबनाची घोषणा केली. याप्रकरणी एक चौकशी कमिटी घोषीत करत आहे. चौकशी कमिटीमधे चौकशी अधिकारी

उपआयुक्त(म), तसेच त्यांना सहायक विधी सल्लागार,श्री.एम.बी.काझी, उपअभियंता हे मदत करतील. त्रिवेणीनगर चौकशी संदर्भात श्री.खरवडकर यांची नेमणुक केली होती त्यांच्याकडे गुंठेवारीचे काम जास्त असल्याकारणाने त्यांचे नांव रद्द करण्यात येत आहे. त्रिवेणीनगर संदर्भात काही गैरसमज निर्माण झाला होता वर्तमानपत्रात बातमी आली होती त्यातील दोषी कर्मचारी श्री.चिरागोद्दीन कलंदर, व श्री.दामू यांना निलंबीत केले होते त्यांना निलंबनाचे आदेश काल देण्यात आले. माझे संरक्षण होते असे पेपरला आले आहे. विभागाने आदेश काढले नव्हते, ते आदेश आता काढले. त्रिवेणीनगर संदर्भात जे कुणी दोषी असेल त्यांच्याविरूध्द सिटीचौक पोलीस स्टेशनमधे गुन्हा नोंदविण्यात यावा. या प्रकरणाची संपूर्ण चौकशी करून पुढील बैठकीत अहवाल सादर करावा. त्रिवेणीनगरचा प्राथमिक अहवाल सादर केलेला आहे. 24 तासात त्रिवेणीनगरच्या दोषीं विरूध्द गुन्हा दाखल करावा. टाउन प्लॅनिंग विभागाच्या जे ई यांनी जागेची मोजणी करावी. अति.शहर अभियंता आणि उपअभियंता श्री.एम.बी.काझी यांचे देखरेखखाली हे काम करण्यात यावे कारण जे निलंबीत कर्मचारी आहे ते वेगवेगळे आरोप प्रत्यारोप तसेच धमकी देत आहे. त्यामुळे गुन्हा तात्काळ दाखल करण्यात यावा.

श्रीमती सफिया मोमिन : आरोग्य विभागातील कर्मचारी श्री.खालेदबीन अहमद, श्री.रमेश शिंदे, श्री.मोरे यांना का निलंबीत करण्यात आले खुलासा करण्यात यावा. त्यांना निलंबीत करण्याची गरज नव्हती.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : सदस्यांनी आदेश दयायचे आणि पुन्हा आपण प्रशासनाला विचारणा करायची.

श्री.प्रशांत देसरडा : गेल्या आठवड्यात मा.आयुक्तांनी अधिकाऱ्यांविरूध्द कार्यवाही केली आहे. नोटीस काढून निलंबीत केले. सहीची जाणीव झाली. मा.आयुक्तांनी निर्णय घ्यावा त्यास सर्व सदस्यांचा पाठिंबा आहे.

मा.सभापती : निलंबनाच्या बाबतीतील सर्व निर्णय प्रशासनावर सोडण्यात यावा.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : निलंबीत झाले म्हणजे दोषी झाले अशातला भाग नाही.

श्री.भगवान घडमोडे : सदरील कर्मचाऱ्यांचे म्हणणे ऐकुन घ्यावे.

श्री.विनायक पांडे : आत्ताच निलंबीत केले आहे आणि लगेच स्थायी समितीमधे येतात. चित्र वेगळे दिसेल. चुकीचा संदेश नागरीकांमधे जाईल प्रशासनाला प्रशासनाचे काम करू द्यावे.

श्री.सतिष कटकटे : जो निर्णय घेतलेला आहे तो योग्य आहे. मा.आयुक्तांचे स्थायी समितीतर्फे अभिनंदन करण्यात यावे.

मा.सभापती : मा.आयुक्त साहेबांनी जी काही निलंबनाची कारवाई केलेली आहे त्या कारवाईमुळे प्रशासनाला योग्य दिशा मिळेल अधिकारी कर्मचारी अत्यंत चांगल्याप्रकारे काम करतील. मा.आयुक्तांनी जी कार्यवाही केलेली आहे त्यास स्थायी समितीचे तर्फे मा.आयुक्तांचे अभिनंदन करण्यात येते.

श्रीमती सफिया मोमीन : क्रिडा अधिकारी श्री.मालोदे यांनी मोठया प्रमाणावर घोटाळा केला आहे त्यांच्यावर कार्यवाही करण्यात यावी.

श्री.भगवान घडमोडे : परमार्थ महिला सांस्कृतिक मंडळाला सर्वसाधारण सभेने मान्य केलेल्या ठरावाप्रमाणे सिडकोतील जागा नाममात्र दराने भाडयाने देण्यात यावी सांस्कृतिक मंडळामार्फत संस्कार केंद्र चालविले जातात.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : सर्वसाधारण सभेने ठराव पारित केलेला आहे त्याप्रमाणे 101 रूपये नाममात्र दराने जागा संस्क्ार केंद्र चालविण्यासाठी देण्यात यावी.

मा.सभापती : स.सदस्यांनी मागणी केल्याप्रमाणे परमार्थ महिला सांस्कृतिक मंडळाला सर्वसाधारण सभेने मान्य केलेल्या ठरावाप्रमाणे जागा भाडयाने देण्यात यावी.

श्रीमती खान मेहरून्निसा : श्री.मालोदे यांना निलंबीत करण्याची कार्यवाही करण्यात यावी.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : सिडकोत जे गार्डन आहे त्या लोकांची केअर टेकर समिती करावी व प्रत्येक गार्डन त्या केअर टेकर समितीला देण्यात यावी निधीची देण्याची आवश्यकता नाही. गार्डनवर नियंत्रण तसेच मेंनन्टनन्स ते करतील. विना पैशाची समिती करावी.

मुख्यलेखाधिकारी : श्री.मालोदे हे क्रिडा विभागात क्रिडाधिकारी म्हणुन कार्यरत आहे त्यांनी सात ते आठ वर्षात 23 ते 23.50 लाखाचे अॅडव्हान्स घेतलेले आहे. हा अॅडव्हान्स ज्या वेगवेगळया स्पर्धा होतात त्यासाठी दिला गेला होता. त्यापैकी 1.50 लाखाचे समायोजन केलेले आहे आजही 22.50 लाखाचे समायोजन बाकी आहे. गेल्या आठवडयात लेखाविभागात त्या सर्व संचिका प्राप्त झाल्या होत्या. तपासणी केली असता त्यात काही त्रुटी आढळुन आल्या त्या त्रुटींची पुर्तता करण्याकरीता संचिका परत त्यांना दिलेल्या आहेत.

मा.सभापती : एकुण किती लाखांचे समायोजन केले आहे.

मुख्यलेखाधिकारी : 22.50 लाखामधुन 1.50 लाखाचे समायोजन केलेले आहे.

श्री.सतिष कटकटे : अॅडव्हान्स देण्याची नियमावली काय आहे.

श्री.प्रशांत देसरडा : एकाच दिवशी दिल्ली आणि त्याच दिवशी पुणे येथे जाण्यासाठी पैसे अॅडव्हान्स उचल केलेली आहे. मागील सर्वसाधारण सभेने जे लेखानुदान मंजूर केलेले आहे त्याच्यातील उचल रकमेचे काय झाले.

मा.सभापती : एकुण उचल किती आहे प्रशासनाने खुलासा करावा.

मुख्यलेखाधिकारी : जवळपास 24 लाखाची उचल आहे. 1.50 लाखाचे समायोजन केलेले आहे.

श्री.सतिष कटकटे : 24 लाख 59 हजार रूपयांची एकुण उचल आहे.

मा.सभापती : दोन वर्षाची उचल आहे का, 24 लाखाचा खुलासा करण्यात यावा.

मुख्यलेखाधिकारी : गेल्या सहा वर्षात उचल केलेली रक्कम आहे.

श्री.प्रशांत देसरडा : न खर्च दिलेला हा तपशिल आहे. ज्या माणासांनी उचल घेतली परंतु खर्चाचा तपशिल दिला नाही, थकबाकी बाकी आहे त्याची चौकशी झाली पाहिजे.

श्री.विनायक पांडे : डिस्ट्रीक स्पोर्ट ऑफिस आणि महानगरपालिकेचे क्रिडा विभाग हे डिस्ट्रीक स्पोर्ट ऑफिसच्या माध्यमातून ज्या स्पार्धा अंडर 19च्या घेण्यात येतात त्या डिएसओ ऑफिस आणि महानगरपालिकेच्या समन्वयातुन घेण्यात येतात. आज वर्तमानपत्रात बातमी आहे की, मौलाना आझाद कॉलेज आणि शिवछत्रपती कॉलेजच्या अंडर 19 विद्यार्थ्यांमधे भांडणे झाली. या

स्पर्धाकरीता महानगरपालिका किती बजेट देत असतो तसेच महाराष्ट्र शासनाचा किती निधी येतो कुठल्या स्पर्धांला किती अगाउ उचल दिली आहे याबाबतची सखोल चौकशी व्हायला पाहिजे.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : अग्रीम त्यांच्या नावावर घेऊन रक्कम कुणाला दिलेली आहे. ज्या हेडमधे पैसे उचल केलेले आहे ते वर्षाच्या शेवटी 31 मार्च त्या त्या वर्षात समायोजन करणे आवश्यक असते. एका कर्मचाऱ्याकडे 26 लाख उचल, तो नोकरीत कसा राहणार. असे किती अधिकारी आहेत, ज्यांना सुट देण्यात आलेली आहे.

मा.सभापती : नियमानुसार समायोजन केव्हा करायला पाहिजे खुलासा करण्यात यावा.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : पदाधिकाऱ्यांकडे किती बाकी आहे खुलासा करण्यात यावा.

मा.सभापती : माझ्याकडे महानगरपालिकेचे देणे असेलतर माझ्यावर गुन्हा नोंदविण्यात यावा. माझ्याकडे जर 10 रूपये असेलतर माझ्याविरूध्द गुन्हा दाखल करावा. सभापतींकडे काही उचल आहे का खुलासा करण्यात यावा.

मुख्यलेखाधिकारी : मा.सभापती यांचेकडे कुठलेही अग्रीम प्रलंबीत नाही. एकुण 77 लाख रूपयांचे अग्रीम आहे कुठल्याही अग्रीमाचे तीन महिण्यात समायोजन झाले पाहिजे.

मा.सभापती : श्री.मालोदे यांनी सहा वर्षात समायोजन केलेले नाही.

श्री.सतिष कटकटे : पैसे कसे येतील हे प्रशासनाने पहावे.

मा.सभापती : मा.आयुक्त हे पैसे वसुल करण्यास सक्षम आहे योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

मा.आयुक्त : या संदर्भात मागील बैठकीत सर्वसाधारण सभेतही चर्चा झालेली आहे. आठ दिवसांचा समायोजनाचा कालावधी दिला होता. तर कार्यालयीन परिपत्रक असे दिले कि जो ऑगष्टचा पगार सप्टेंबरमधे देय होतो तो रोखला जाईल यासाठी एक महिण्याचा कालावधी दिला कारण मागचे जे पत्र दिले हाते ते 29.07.2009 चे पत्र होते. आज महिणा पुर्ण झाला आहे मला अपेक्षित हाते की त्यांनी आठ दिवसांत पैसे भरावेत परंतु पत्र असे गेले की, ऑगष्टचा पगार रोखला जाईल गेल्या आठवडयात या संदर्भात रिव्ह्यु घेतला. कालच्या बैठकीत एक 92ची फाईल ची 10 हजाराचे ॲडव्हान्स आहे नंतरचे 2000 चे आहे. जुणे जे ॲडव्हान्स बाकी आहे त्यांना निलंबीत करून टाकू असा विचार चालू होता परंतु 29.07.2009 रोजी पत्र गेले होते. हया 31 तारखेपर्यंत वाट पहाणार आहोत पाठपुरावा सुरू आहे ज्यांनी ज्यांनी समायोजन करण्याचा प्रयत्न केला त्याच्याबाबतीत सर्व अधिकाऱ्यांनी कर्मचाऱ्यांच्या विभागप्रमुखांनी कर्मचाऱ्यांनी जे कागदपत्र सादर केले आहे त्या संदर्भात एक वर्कशॉप घेण्यात यावी व अग्रीम भरण्याची कार्यवाही करण्यात यावी जर पगारापेक्षा जास्त पैसे असतील तर त्यांच्या प्रॉपर्टीवर कार्यवाही करू.

श्रीमती सफिया मोमिन : महानगरपालिकेचे अन्न निरीक्षक यांचे अन्नभेसळीकडे दुर्लक्ष करीत आहे.

श्री.प्रल्हाद निमगांवकर : शहानुरमियॅादर्गा येथे कमानीच्या ठिकाणी 8-10 दिवसापुर्वी अपघाताने एकाचा मृत्यु झाला आहे. येथील रस्त्याचे कामाबद्दल काय कार्यवाही केली.

कार्य.अभि.(इ, फ) : शहानुमियॉ दर्गा येथे मागील महिण्यात अपघात झाला होता तेव्हा तिथे ट्राफिक विभागाचे अधिकारी श्री.ठाकुर यांनी भेट दिली होती जड वाहने जावू नये म्हणुन दोन्ही साईडला गर्डर लावले होते. एक दर्गाच्या बाजुला आणि बिड वळणावर परंतु ते तीसऱ्याच दिवशी अपघात होवुन तुटले. एमएसआरडीसी ला मधल्या काळामधे ती जागा महानगरपालिकेच्या मालकीची आहे तीथे 24 मीटरच्या रोडवर पुल बांधण्यास काही हरकत नाही अस पत्र तेव्हाच देण्यात आले. एमएसआरडीसी ने निवीदा काढली आहे जागा हस्तांतरणाची प्रक्रिया चालू आहे.

श्री.प्रल्हाद निमगांवकर : सुतगीरणी येथील निविदा कोणी घेतली नाही म्हणुन रद्द केले का?

मा.सभापती : खुलासा करण्यात यावा.

श्री.सतिष कटकटे : टाउनहॉल येथे नगरपरिषदेच्या काळातील दोन ट्रक संचिका पडलेल्या होत्या त्या कुठल्या संचिका होत्या त्या संचिका कुठे ठेवण्यात आल्या.

कार्य.अभि. (श्री.पानझडे) : पावसाच्या पाण्यासंदर्भात स.सदस्यांनी जो मुद्दा उपस्थित केलेला आहे मल्हार चौक येथे पाणी साठते, त्यावेळेस अंदाजपत्रक तसेच निवीदा काढण्यात आली होती परंतु त्या नंतर काय झाले याबाबतची माहिती माझ याकडे नाही कारण तो भाग माझ्या कार्यकक्षेत नाही. टाउन हॉल येथे पुर्वी स्टोअर होते त्याचे बांधकाम चालू होते ते सर्व रेकॉर्ड मौलाना अबुल कलाम आझाद रिसर्च सेंटरच्या एका खोलीमधे ठेवण्यात आलेले आहे. त्याचे व्यवस्थितपणे नियोजन/विभाजन करण्यासाठी कोणाचीतरी नेमणुक होणे गरजेचे आहे.

मा.सभापती : ताबा आपला आहे काय?

कार्य.अभि.(ब, क) : ताबा कुणाचा नाही, खोलीमधे रेकॉर्ड ठेवण्यात आले आहे. कुलुप लावलेले आहे.

मा.सभापती : रेकॉर्ड महत्वाचे आहे का?

कार्य.अभि.(श्री.पानझडे) : रेकॉर्डचा अभ्यास केल्याशिवाय सांगता येणार नाही. त्यात महत्वपुर्ण कागदपत्र असू शकतात.

श्री.भगवान घडमोडे : रॉडिंग मशीनच्या अहवाला बाबत माहिती देण्यात यावी.

श्री.प्रशांत देसरडा : नविन काम अलॉट केले आहे काय?

श्रीमती खान मेहरून्निसा : रमजान महिना सुरू असल्याने शाळकरी मुलांना फळे व खजूर वाटप करावीत हया वर्षी टेंडर काढण्यात आले नाही टेंडर काढण्यात यावे.

मा.सभापती : रमजानचा महिना सुरू असल्याने मनपा शाळेतील मुलांना शिक्षणाधिकारी यांनी त्वरीत उद्याच्या उद्या मुलांना देण्यात यावे. आवश्यकता पडली तर 5-2-2 मध्ये काम करावे.

कार्य.अभियंता (ब, क) : प्रत्येक वार्डास दोन रॉडिंग मशीन दिल्या होत्या.

श्री.सतिष कटकटे : रॉडिंग मशीनचे इंजिन आणि टायर गायब झालेली आहे.

कार्य.अभियंता (ब, क) : माझ्या वार्डापुरते बोलायचे झाल्यास मी व्यवस्थित काम करून घेतलेले आहे. प्रत्येक वार्डात 10 लाखाचे टेंडर काढण्यात आले होते. एकुण 60

लाखाचे सहा टेंडर काढले होते. माझ्या वार्डात 20 लाखाचे काम पुर्ण झालेले आहे ॲप्रुटींगचे एकही ए-वन केलेले नाही.

श्री.प्रशांत देसरडा : प्रत्येक वार्डाची यादीची मागणी केली होती.

कार्य.अभियंता (ब, क) : यादी थोडयावेळात देण्यात येईल्. वार्ड ब आणि क मधे कुठेकुठे काम केले किती लाखाचे काम केले याबाबतची माहिती देण्यात येईल. श्री.मोहन मेघावाले यांच्या वार्डातील 19 लाखाचे इस्टीमेट होते ते रद्द करण्यात आले. त्या ठिकाणी वॉटर आणि ड्रेनेज चोकअपचे कामे हे पुर्णपणे मशीनद्वारे करून घेतले.

श्रीमती खान मेहरून्निसा : वार्ड क मधे रॉडिंगमशीनचे काम चांगल्या प्रकारे चालू आहे.

श्री.सतिष कटकटे : ए वन आणि रेट लिस्ट बाबत माहिती देण्यात यावी.

मा.सभापती : पुढील बैठकीत खुलासा करण्यात यावा.

श्री.प्रशांत देसरडा : 30 लाख रूपये खर्च करून नाले सफाई केली त्या अहवालाबाबत माहिती देण्यात यावी.

श्रीमती सफिाया मोमीन : उड्डाणपुलाचे रोडचे काम सर्वसाधारण सभेत मंजूर झालेले आहे परंतु प्रत्यक्षात काम सुरू नाही. लवकरच आचारसंहिता लागू होणार आहे.

श्रीमती खान मेहरून्निसा : सर्व वार्ड इंजिनिअर आणि जेई यांची एक बैठक आयोजित करण्यात यावी. इस्टीमेट तयार करण्यात आले नाही. वार्ड क कार्यालयात वार्ड इंजिनिअर उपस्थित राहत नाही त्यामुळे अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे.

मा.सभापती : यासंदर्भात संचिका पुटअप झालेली आहे उपआयुक्त(म) यांचेकडे संचिका गेलेली आहे. उड्डाणपुलाच्या संदर्भात शहर अभियंता तसेच मा.आयुक्त यांचेशी चर्चा करून काम त्वरीत सुरू करण्याचे प्रयत्न करू.

श्रीमती सफिया मोमीन : माझ्या वार्डात 24 मीटर डिपी रोड आहे त्या ठिकाणी बाजूच्या नाल्या,पाईप इत्यादि कामे केलेली नाही. रोडच्या मधे 13 मिटर जी.आय. पोल आहे त्या ठिकाणचे केबल उघडया अवस्थेत आहे. संबधीतास निलंबीत करण्यात यावे.

श्रीमती खान मेहरून्निसा : शहरात 52 दरवाजे आहे काही दरवाजे दुरूस्तीसाठी पालकमत्र्यांनी फंड दिला होता काही दरवाजांचे कामे बाकी आहे. कटकटगेट येथे सहा शाळा आहे त्याठिकाणी दरवाजाचा काही भाग पडल्यामुळे विद्यार्थीनीला मार लागलेला आहे. ऐतिहासिक इमारत असून लवकर दुरूस्त करण्यात यावे.

श्री.प्रल्हाद निमगांवकर : शहरात फवारणी व्यवस्थित रित्या होत नाही.

आरोग्य वैद्य.अधिकारी : स्वाईन फ्लू संदर्भात महानगरपालिकेच्या रूग्णालयात तपासणीची व्यवस्था केली होती. सकाळी 9 ते रात्री 9 वाजेपर्यंत वेगवेगळया रूग्णांची तपासणी करून संशयीत वाटल्यास त्यास सरकारी रूग्णालयात पाठवित होतो. 13897 रूग्णांची आत्तापर्यंत तपासणी झाली आहे, 196 रूग्णांना घाटी रूग्णालयात लाळग्रंथी तपासणीसाठी पाठविले होते, 18 रूग्णांचे पॉसिटिव्ह रिपोर्ट आलेले आहे त्यापैकी महानगरपालिका क्षेत्रामधील 14 रूग्ण होते. या सर्व रूग्णांच्या घरी जावून चौकशी करून टॅमिफ्लूच्या गोळयांचे वाटप केले आहे. त्या सर्व रूग्णांमधे सुधारणा झाल्याचे दिसुन येते तसेच रूग्णांचे येण्याचे प्रमाण कमी झाले आहे.

श्री.सतिष कटकटे : स्वाईन फ्लू रोगाच्या नियंत्रणासाठी मास्क खरेदी केलेली आहे काय?

आरोग्य वैद्य.अधिकारी : 2500 मास्क खरेदी केलेले आहे, त्यापैकी 2000 मास्क मिळालेले आहेत. आरोग्य विभागातील सर्व कर्मचाऱ्यांना त्याचा पुरवठा केलेला आहे. इतर विभागांमधे लागेल तसे देण्यात येतील.

श्री.सतिष कटकटे :महानगरपालिकेत ज्या शाळा आहे त्यात मनपाचे 20 ते 25 हजार विद्यार्थी आहे त्या संदर्भात काही व्यवस्था केलेली आहे काय?

आरोग्य वैद्य. अधिकारी : जागतीक आरोग्य संघटनेच्या निर्देशानुसार सर्वसामान्य लोकांनी मास्क वापरण्याची गरज नाही. ज्यांना सर्दीचे लक्षण आहे त्या लोकांनीच मास्क वापरावे.

श्री.सतिष कटकटे : मास्क खरेदी करून शाळेत मास्क वाटप करावेत. या ठिकाणी कर्मचाऱ्यांचा विचार करण्यात आला आहे.

मा.सभापती : रूग्णांची तपासणी करण्यात येत असल्यामुळे त्यांना मास्क वापरणे आवश्यक आहे म्हणून त्यांना मास्कचा पुरवठा केला आहे.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : प्रत्येकाला मास्क लावून भिती निर्माण करू नये, ज्यांना स्वाईन फ्लूचे किंवा सर्दीचे लक्षण आहे अशा लोकांनीच मास्क वापरायला पाहिजे. सुदैवाने महापालिकाक्षेत्रात पावसामुळे स्वाईन फ्लूचा फैलाव कमी प्रमाणात झाला आहे. तसेच स्वाईन फ्लूमध्ये महानगरपालिकेने चांगले काम केलेले आहे. प्रश्न आहे की, मास्क सगळयांना द्यायचे कि ठराविक लोकांना द्यायचे हे ठरविण्यात यावे.

श्रीमती खान मेहरून्निसा : औषधांचा पुरवठा केलेला नाही गेल्या एक महिण्यांपासून डॉक्टर उपलब्ध नाही.

मा.सभापती :प्रशासनाने खुलासा करावा.

आरोग्य वैद्य.अधिकारी : गरीबनवाज हॉस्पीटलमधे स.सदस्यांची तक्रार आली होती. डॉक्टर वेळेवर येत नाही म्हणून तसे काही घडत नाही. संबधीत डॉक्टरांची बदली केलेली आहे त्या ठिकाणी डॉ.राणे यांना देण्यात आले आहे.

मा.सभापती : शाळेतील विद्यार्थ्यांना मास्क देणे गरजेचे नाही असे आरोग्य वैद्यकीय अधिकाऱ्यांचे मत आहे. जर परिस्थिती निर्माण झाली तर प्रशासनाने मास्क खरेदी करून ठेवण्यात यावे. ज्या प्रमाणात आवश्यकता लागेल त्या प्रमाणे आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांचे सल्ल्याप्रमाणे वितरीत करण्यात यावे.

**<u>विषय क्र. १११ :</u>**

कार्यकारी अभियंता (ई व फ) यांनी प्रस्ताव दिला की, वॉर्ड क्र. ९२ मिलिंदनगर येथे खुल्या जागेत उद्यान विकसीत करण्याच्या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.११,९७,५५७/- च्या अंदाजपत्रकास मा.स्थायी समिती विषय क्र.३५ दिनांक २०/७/२००९ अन्वये मान्यता प्राप्त झ ाालेली आहे. त्यानुसार सदर कामाकरीता निविदापत्रके मागविण्यात आली असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण तीन निविदापत्रके विकल्या गेली व निविदापत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत सदरील तीनही निविदपत्रके दर भरून प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके उघडण्यात आली असता खालील प्रमाणे दर प्राप्त आहेत.

| | | |
|---|---|---|
| १. | मे. फाईव्हस्टार कन्स्ट्रक्शन | १५.३६% कमी दराने |
| २. | काझी महंमद फारूख म.इस्माईल | १४.९९% कमी दराने |
| ३. | श्री. सिद्यीकी जलिसुद्यीन | ५.९०% कमी दराने |

वरील प्राप्त निविदापत्रकापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५.३६% कमी दराची मे. फाईव्हस्टार कन्स्ट्रक्शन यांची निविदा आहे.

तरी मे.फाईव्हस्टार कन्स्ट्रक्शन यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५.३६% कमी दराचे निविदापत्रक मंजुरीचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

मा.सभापती : विषय क्र.111 मंजुर करण्यात येत आहे. सन 2006-07,2007-08 च्या वार्षिक लेखा परिक्षण अहवाल प्रशासनाने सादर केलेला आहे. त्यासाठी वेगळी बैठक लावून चर्चा करण्यात येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र. ९२ मिलिंदनगर येथे खुल्या जागेत उद्यान विकसीत करण्याच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५.३६% कमी दराची मे. फाइव्हस्टार कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ११२ :**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०६ (३) अन्वये मुख्य लेखा परीक्षक यांनी सादर केलेल्या सन २००६-२००७ व २००७-२००८ च्या वार्षिक लेखा परीक्षण अहवालावर विचार विनिमय करणे.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार, सन 2006-07, 2007-08 च्या वार्षिक लेखा परिक्षण अहवालावर विचार विनिमय करण्यासाठी स्वतंत्र बैठक आयोजित करण्यात यावी असे सर्वानुमते ठरले.

मा.सभापती : ऐनवेळचे सर्व प्रस्तांवाना मंजुरी देण्यात येते.

<u>ऐनवेळचे विषय</u>

(टीप :- *दि.२१/८/०९ तहकुब सभा दि.२६/८/०९ ला संपन्न झाली(का.प.क्र.१२). दि.२७/८/०९ रोजी आयोजित सभेची (का.प.क्र.१३) विषयपत्रिका दि.२३.८.०९ रोजी निर्गमीत करण्यात आली त्यावर विषय क्र.११३ आहे.)

**विषय क्र. ११४ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.२ मयुरपार्क जाधववाडी येथील रत्नदिप हौ. सोसा., सावजी ले-आऊट व स.नं.१५६ मधील सिमेंट कॉंक्रीट करणे या कामाचे रक्कम रू.१९,७८,०००/- चे अंदाजपत्रक सा.बां. विभागाच्या सन २००८-२००९ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असून त्यास मा.आयुक्त यांची मान्यता प्राप्त झाली असून सदरील कामासाठी २००९-१० वर्षातील लेखाशिर्ष नविन कॉंक्रीट रस्ते शहरी भाग अ.क्र.०१ अंतर्गत पृष्ठ क्र.SCR B-1 वर तरतूद मा.सभापती, स्थायी समिती यांचे पत्रानुसार उपलब्ध करून देण्यात आली आहे.

तरी रक्कम रूपये १९,७८,०००/- चे अंदाजपत्रक विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.२ मयुरपार्क जाधववाडी येथील रत्नदिप हौ. सोसा., सावजी ले-आऊट व स.नं.१५६ मधील सिमेंट कॉंक्रीट करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.१९,७८,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ११५ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.३ मधील अंतर्गत रस्त्यांचे पुनःडांबरीकरण करण्याच्या कामाचे रक्कम रू.१८,९६,००९/- चे अंदाजपत्रक सा. बां. विभागाच्या सन २००८-०९ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असून त्यास मा. आयुक्त यांची मान्यता प्राप्त झाली आहे. सदरील कामासाठी सन २००९-१० वर्षातील लेखाशिर्ष पुनःडांबरीकरण शहरी भाग अंतर्गत अंदाजपत्रक नोंदवही पृष्ठ क्र.१९ वर तरतुद उपलब्ध करून देण्यात आली आहे.

तरी रक्कम रूपये १८,९६,००९/- चे अंदाजपत्रक विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र. ३ मधील अंतर्गत रस्त्यांचे पुनःडांबरीकरण करण्याच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.१८,९६,००९/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ११६ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.७३ मध्ये विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन चोकअप झालेली असून अनेक ठिकाणी ड्रेनेज पाईप फुटल्यामुळे रस्त्यावरून घाण पाणी, मैला वाहात आहे. त्यामुळे नागरीकांच्या आरोग्यास धोका निर्माण झालेला असून सदरील ड्रेनेज लाईनची दुरूस्ती तातडीने करणे आवश्यक आहे. या कामासाठी रक्कम रू.६.६० लक्ष चे अंदाजपत्रक तयार असून नागरीकांचे आरोग्याचा प्रश्न व कामाची तातडी लक्षात घेता तरी सदरील काम मुं.प्रां.मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची-ड प्रकरण ५ चे नियम २ (२) अन्वये उपलबध ठेकेदारा मार्फत अं.प.दरावर तातडीने करून घेण्याचे मंजुरीस्तव सादर.

करीता प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

सुचक : दामोधर शिंदे                                        अनुमोदक : रविकांत गवळी

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.७३ मध्ये विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन फुटून रस्त्यावरून घाण पाणी, मैला वाहात असल्याने नागरीकांच्या आरोग्यास धोका निर्माण झालेला असल्यामुळे नागरीकांचे आरोग्याचा प्रश्न व कामाची तातडी लक्षात घेता तरी सदरील काम मुं.प्रां.मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची-ड प्रकरण ५ चे नियम २ (२) अन्वये उपलबध ठेकेदारा मार्फत अं.प.दरावर तातडीने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ११७ :**

कार्यकारी अभियंता (ई व फ) महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, मेहेरसिंग नाईक चौक ते आधार हॉस्पीटल पर्यंत रस्त्याचे पुनःडांबरीकरण करणे या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.१९,९७,५००/- च्या अंदाजपत्रकास ठराव क्र.२२२ दिनांक २०/०२/२००९ अन्वये मा.स्थायी समितीची मंजुरी प्राप्त झाली असून सदरील कामासाठी निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या अंमि तारखेपर्यंत एकुण चार निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत तीन निविदा दर भरून प्राप्त झाल्या असून त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | मे.आदिनाथ कन्स्ट्रक्शन | ३.१०% कमी दराने |
| २. | श्री के.बी.पाथ्रीकर | अंदाजपत्रकीय दराने |
| ३. | मे. ए. एस. कन्स्ट्रक्शन | ८.८% जास्त दराने |

वरील प्राप्त निविदापत्रकापैकी मे.आदिनाथ कन्स्ट्रक्शन यांचे निविदांचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३.१०% कमी असे आहेत.

तरी मे.आदिनाथ कन्स्ट्रक्शन यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३.१०% कमी दराचे निविदापत्रक मा.स्थायी समितीच्या मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मेहेरसिंग नाईक चौक ते आधार हॉस्पीटल पर्यंत रस्त्याचे पुनःर्डांबरीकरण करणे या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३.१०% कमी दराची मे.आदिनाथ कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ११८ :**

शहर अभियंता, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, शहानुरवाडी येथील आठवडी बाजाराची १०००० चौ.मी. जागा बी.ओ.टी. तत्वावर विकासकाकडून विकसीत करण्यात आली असून सदर ठिकाणी पेव्हर ब्लॉक बसविण्यात आले असुन सदर आठवडी बाजार क्षेत्राचे भाडे वसुलीसाठी फेर निविदा कार्यवाही करावयाची आहे.

यापुर्वी सदर आठवडी बाजाराचे यापुर्वीचे दाखल निविदा दराच्या अनुषंगाने दिनांक ४.१२.२००८ रोजीच्या मा.स्थायी समिती सभेने विषय क्रमांक १३७ अन्वये पारीत ठरावानुसार सदर आठवडी बाजार क्षेत्र दर सोमवारी आठवडी बाजार म्हणून वापरासाठी आणि अन्य सहा दिवस परिसरातील नागरिकांसाठी जॉगींग ट्रॅकचे वापरासाठी फेर निविदा कार्यवाहीस आदेशीत आहे. या अनुषंगाने प्रस्ताव दाखल करण्यात येतो की, महानगरपालिकेचे महसुली उत्पन्नात वाढ होण्याचे दृष्टीने आठवडी बाजार क्षेत्रात दर सोमवारी आठवडी बाजारासाठी वापर करून आठवड्याचे इतर दिवशी आठवडी बाजार क्षेत्राचा वापर विकास नियंत्रण नियमावलीतील अनुज्ञेय वापरासाठी केल्यास महानगरपालिकेस वाढीव महसूली उत्पन्न मिळणे संभवनीय आहे. तरी फेर निविदा कार्यवाहीचे दृष्टीने उक्त विकल्पा आधारे फेर आढाव्यासह आठवडी बाजार क्षेत्र निविदेसाठी प्रकरण मा.स्थयी समिमी सभेचे विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेचे महसुली उत्पन्नात वाढ होण्याचे दृष्टीने शहानुरवाडी येथील आठवडी बाजाराची १०००० चौ.मी. विकसीत करण्यात आलेली जागा आठवडी बाजार क्षेत्रात दर सोमवारी आठवडी बाजारासाठी वापर करून आठवड्याचे इतर दिवशी आठवडी बाजार क्षेत्राचा वापर अनुज्ञेय वापरासाठी फेर निविदा कार्यवाहीचे दृष्टीने आठवडी बाजार क्षेत्राचे भाडे वसुलीसाठी फेर निविदा कार्यवाही करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ११९ :**

सहाय्यक संचालक नगर रचना यांचेकडून प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मो. भावसिंगपुरा स.नं. २६/P च्या जागेकरीता श्रीमती दमयंती सोनवणे व इतर यांनी रेखांकन प्रस्ताव सादर केला. ह्या जमीनीपैकी काही क्षेत्र मंजूर विकास योजना ४५.० मी. रूंद रस्त्याने बाधीत होत आहे. बाधित क्षेत्र संपादीत करून त्याचे देय मोबदला रक्कमेतून उर्वरित क्षेत्राचे रेखांकन प्रस्तावासाठीचे विकास खर्च रक्कम व जमिन विकास शुल्क वळती करून घेऊन उर्वरित रक्कम देण्यात यावी म्हणुन त्यांची मागणी आहे.

या प्रकरणी बाधित क्षेत्राचा देय मोबदलारक्कम रू.१४,५८,५८०/- होत असून त्यातून या रेखांकन प्रस्तावाचे विकास खर्च रक्कम, जमिन विकास शुल्क वळती करून घेऊन नेहमीच्या

अटी/शर्तीस अधिन राहून खरेदी खता आधारे जागा हस्तांतरीत करून घेऊन उर्वरीत रक्कम संबंधीतास देण्याचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

मा. सभापती : ऐनवेळचा प्रशासनाचा प्रस्ताव आलेला आहे.

श्री.सतीश कटकटे : जे १४ लाख रूपये दिले, किती वर्षापासुन जमीन हस्तांतरण केली त्यावेळच्या रेडी रेकनरचा दर काय होता, आजचा रेडी रेकनर प्रमाणे किती रक्कम देय आहे?

मा. सभापती : ADTP यांनी संबंधीतांना चालु वर्षाच्या रेडी रेकनर प्रमाणे रक्कम देण्यात यावी असा प्रस्ताव मान्य करण्यात येतो.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर : चालु रेडी रेकनर प्रमाणे पैसे जमा करून घेतले आहे काय?

मा. सभापती : होय, चालु वर्षाचे रेडी रेकनरच्या दरानुसार संबंधीतांना मोबदला अदा करण्यात यावा.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार मो. भावसिंगपुरा स. नं. २६/P च्या जागेकरीता श्रीमती दमयंती सोनवणे व इतर यांनी दाखल केलेल्या रेखांकन प्रस्तावानुसार ह्या जागेतून मंजुर विकास योजना ४५.० मीटर रूंद रस्त्याने बाधीत क्षेत्राचा देय मोबदला रक्कम चालु वर्षाच्या रेडी रेकनर दराप्रमाणे देण्यात यावा. देय मोबदला रक्कमेतून रेखांकन प्रस्तावाचे विकास खर्च रक्कम, जमिन विकास शुल्क वळती करून घेऊन नेहमीच्या अटी/शर्तीस अधीन राहून खरेदीखता आधारे जागा हस्तांतरीत करून घेऊन उर्वरीत रक्कम संबंधीतास देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १२० :**

दिनांक १८/८/२००९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेत ठराव क्र.८७ अन्वये -

परमार्थ सांस्कृतिक महिला मंडळाचे उपाध्यक्ष सौ.विमल डिघुळे यांनी एन-४, डी-सेक्टर हनुमान मंदीरा समोरील व पोलीस चौकीच्या बाजूस असलेली जागा भाडेपट्ट्यावर देणेसाठी मा.सर्वसाधारण सभा विषय क्र.४६१ च्या ठरावानुसार विनामुल्य देखरेख व संगोपनास सिडको प्रशासनाकडून देण्यात आलेली आहे. परंतु महानगरपालिकेची खुली जागा विनामुल्य देण्याची अधिनियमात तरतुद नाही म्हणुन प्रती चौ.मी. प्रती माह रू.२३/- भाडे निश्चित करून सदरील ठिकाणचे रू.१,०९,२९६/- प्रती वर्ष व अनामत रक्कम रू.१,०९,२९६/- आकारणेस मंजुरी मिळालेली आहे.

परमार्थ सांस्कृतिक महिला मंडळ ही समाजकार्य करणारी संस्था असून लोकोपयोगी कामासाठी सदरची जागा या मंडळास देखरेख व संगोपनास विनामुल्य देण्याबाबत सर्वसाधारण सभेने मान्यता दिलेली होती. तथापी नाममात्र वार्षिक भाडे रू.१०१/- आकारणी करून सदरची जागा मंडळास देण्यात यावी.

करीता प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

सुचक : सतीश कटकटे अनुमोदक : भगवान घडमोडे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे परमार्थ सांस्कृतिक महिला मंडळास एन-४, डी-सेक्टर हनुमान मंदीरा समोरील व पोलीस चौकीच्या बाजूस असलेली जागा भाडेपट्ट्यावर देण्या संदर्भात स्थायी समिती ठराव क्र.८७ दि.१८/८/२००९ च्या ठरावानुसार आकारण्यात आलेले भाडे जास्त असून,

परमार्थ सांस्कृतिक महिला मंडळ ही समाजकार्य करणारी संस्था असल्यामुळे लोकोपयोगी कामासाठी सदरची जागा या मंडळास नाममात्र वार्षिक भाडे रू.१०१/- आकारणी करून देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १२१ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र. ३७ अंतर्गत कामगार कॉलनी भागातील नागरीकांना दुर्गंधीयुक्त पाणी पुरवठा होत आहे. ड्रेनेज लाईन तुंबण्याचे प्रकार होत आहेत. त्यामुळे नागरीकांचे आरोग्य धोक्यात आलेले असून कावीळ सारखा आजार काही लोकांना झालेला आहे. या भागातील नागरीकांनी मा.आयुक्तांकडे मोर्चा आणून निवेदन दिलेले आहे. त्यामुळे या भागातील ड्रेनेज लाईन व जलवाहिनी बदलण्याचे काम तातडीने करून घेणे गरजेचे आहे. त्यासाठी अर्थसंकल्पात उपलब्ध आहे. तरी खालील दर्शविलेली कामे मुं.प्रां.मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची-ड प्रकरण ५ चे नियम २ (२) अन्वये उपलबध ठेकेदारा मार्फत अं.प.दरावर तातडीने करून घेण्याचे मंजुरीस्तव सादर.

१. वॉर्ड क्र.३७ मध्ये पैठणगेट, कामगार कॉलनी, दलालवाडी भागात नवीन ड्रेनेज लाईन टाकणे.-
- ६.०० लक्ष

२. वॉर्ड क्र.३७ मध्ये पैठणगेट, कामगार कॉलनी, दलालवाडी भागात नवीन जलवाहिनी टाकणे.
- ४.०० लक्ष

करीता प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

सुचक : सतीश कटकटे                    अनुमोदक : कचरू सोनवणे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र. ३७ अंतर्गत कामगार कॉलनी भागातील नागरीकांना कावीळ सारखा आजार काही लोकांना झालेला आहे. या भागातील नागरीकांचे आरोग्याचा प्रश्न लक्षात घेताड्रेनेज लाईन व जलवाहिनी बदलण्याचे काम खालील दर्शविलेली कामे मुं.प्रां.मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची-ड प्रकरण ५ चे नियम २ (२) अन्वये उपलबध ठेकेदारा मार्फत अं.प.दरावर तातडीने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

१. वॉर्ड क्र.३७ मध्ये पैठणगेट, कामगार कॉलनी, दलालवाडी भागात नवीन ड्रेनेज लाईन टाकणे.-
- ६.०० लक्ष

२. वॉर्ड क्र.३७ मध्ये पैठणगेट, कामगार कॉलनी, दलालवाडी भागात नवीन जलवाहिनी टाकणे.
- ४.०० लक्ष

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १२२ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.२ अंतर्गत सुरेवाडी भागात टप्पा क्र.२ मधील गल्ली क्र.५, ६ व ७ येथे १००, १५० व २०० मी.मी. व्यासाची डी.आय.के.७ जलवाहिनी टाकावयाचे प्रस्तावित आहे.

सुरेवाडी संपूर्ण भागात काळी माती असून दाट लोकसंख्या आहे, या भागामध्ये जड वाहनांची वर्दळ जास्त असल्याने सिमेंट जलवाहिन्या वारंवार फुटतात व लिकेज होतात. त्यामुळे पाणी कमी मिळणे, दुषित पाणी येणे याबाबतच्या तक्रारी जास्त येतात. जलवाहिनी दुरूस्त करण्यासाठी खर्च करावा लागतो. करिता या भागामध्ये डीआय जलवाहिन्या टाकणे गरजेचे आहे. नवीन जलवाहिन्या कार्यान्वीत झाल्यानंतर या भागाचा पाणी पुरवठा एकाच वेळेमध्ये करणे शक्य होऊ शकेल, तसेच पाणी वाया जाणार नाही.

करिता जलवाहिनी टाकण्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे दरसुची सन २००८-०९ नुसार रक्कम रू.१४,६९,४००/- एवढ्याचे अंदाजपत्रक करण्यात आले आहे.

करिता वॉर्ड क्र. २ अंतर्गत सुरेवाडी भागात टप्पा क्र.२ मधील गल्ली क्र.५, ६ व ७ येथे १००, १५० व २०० मी.मी. व्यासाची डी.आय.के.७ जलवाहिनी टाकणेच्या कामासाठी अंदाजपत्रक रक्कम रूपये १४,६९,४००/- चे मान्यतेबाबत तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र. २ अंतर्गत सुरेवाडी भागात टप्पा क्र.२ मधील गल्ली क्र.५, ६ व ७ येथे १००, १५० व २०० मी.मी. व्यासाची डी.आय.के.७ जलवाहिनी टाकणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रूपये १४,६९,४००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

'राष्ट्रगीता'नंतर सभा संपल्याचे मा.सभापती यांनी घोषित केले.

**नगर सचिव**
महानगरपालिका औरंगाबाद